# पी.एन.पी. महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन




बुधवार दिनांक 9 /2/ 2022 रोजी पी. एन.पी. वरिष्ठ महाविद्यालयात अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाअंतर्गत 'बँकिंग क्षेत्र: पार्श्वभूमी आणि सुधारणा' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. अविनाश कुलकर्णी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवरांनी बँकिंग हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय असल्याचे सांगत विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला आणि बँकांची पार्श्वभूमी उलगडली. बँकांचे विविध प्रकार, बँकांचे खाजगीकरण का झाले?, विलिनीकरण आणि एकत्रीकरण यांमध्ये असलेला फरक, बँकांमध्ये झालेल्या सुधारणा, बँकांमधील नवीन संकल्पना अशा बँकांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकताना विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसनही केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, प्रा. विक्रांत वार्डे , कला विभाग प्रमुख प्रा. सौ नम्रता पाटील, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. रसिका म्हात्रे यांनी केले तर आभार प्रा. प्रीती पाटील यांनी मानले.